पुण्यनगरी - १५/१२/१३

# डोळ्यांच्या पडद्याचे आज तपासणी शिबीर

जळगाव : येथील खान्देश सेंट्रल मॉल येथे आज सकाळी ९ ते संध्याकाळी ४ या वेळेत डोळ्यांच्या पडद्याचे (रेटिना) तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. रेटिना इंडिया व एम्को फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबविला जात आहे.

या शिबिरामध्ये बायोनिक आयचे संशोधक, अमेरिका येथील रहिवासी व संकरा नेत्रालय चेन्नई येथील पूर्व सल्लागार डॉ.रजत अग्रवाल हे आपल्या तज्ज्ञ सहकाऱ्यांसह डोळ्यांच्या पडद्याचे (रेटिना) तपासणी व मार्गदर्शन करणार आहेत. उच्च मधुमेह, रक्तदाब असलेल्या रूग्णांसाठी रेटिना तपासणी अतिशय महत्वाची असून डायबेटिक रेटिनोपॅथी तसेच रेटिनल डिटॅचमेंट (डोळ्यांचा पडदा सरकणे) अशा रूग्णांना ते मार्गदर्शन करतील. गरजू रूग्णांसाठी विनामूल्य जाण्या- येण्याची व्यवस्था करण्यात येईल.